दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २९० । बुधवार १९ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## अवैध धंद्यांवर एलसीबीचे एकाच दिवशी ११ छापे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने एकाच दिवशी तब्बल ११ ठिकाणी छापे टाकत अवैध दारू व जुगार अड्ड्यांवर कारवाई केली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे आणि अंमलदारांच्या तीन विशेष पथकांनी संगमनेर शहर, नेवासा आणि श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही मोहीम राबवली. या कारवाईत पोलिसांनी ११ गुन्हे दाखल केले असून, सुमारे ४४ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

संगमनेर शहरात जुगारावर एका ठिकाणी तर अवैध दारूच्या धंद्यांवर तीन ठिकाणी छापे टाकण्यात आले.

नेवासा अवैध दारू विक्रीवर एका ठिकाणी कारवाई करण्यात आली. श्रीरामपूर तालुक्यात जुगारावर ४ ठिकाणी, तर अवैध दारूवर दोन ठिकाणी छापे टाकण्यात आले.

---

अ.नगर जैन ओसवाल को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.

## चेअरमनपदी श्री. दिपक बोथरा आणि व्हा. चेअरमनपदी श्री. गणेश काँकरिया यांची निवड




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अ-नगर जैन ओसवाल क्रेडीट सोसा. पतसंस्थेवर चेअरमनपदी श्री. दिपक बोथरा आणि व्हा. चेअरमनपदी श्री. गणेश काँकरिया यांची एकमताने निवड करण्यात आली.

विशेष म्हणजे पतसंस्थेची नुकतीच ८१वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्री. बडिसीजान ओसवाल कार्यालयात खेळी मेळीच्या वातावरणात पार पडली होती. त्यानंतर दि. १४.०८.२६ रोजी वरील निवड एकमताने करण्यात आली.

पतसंस्थेचे ४० कोटी पर्यंत भाग भांडवल व ठेवी असून ०% आहे. (शुन्य टक्के आहे.) दरवर्षी १५% लाभांश सभासदांना देण्यात येतो. १००० रु. ठेव पावती ५ वर्षात डबल रक्कम भेट ही देण्यात आली.

संस्थेचे ३०९९ सभासद असून दरवर्षी नफ्यामध्ये वाढ होत असून सर्व साधारण सभासदांना कर्जवाटप खूप कमी टक्क्यामध्ये दिले जाते. गरजू सभासदांना सुवर्णकमल योजने अंतर्गत बडिसीजान ओसवाल श्री. संघ व संस्थेतर्फे कर्ज दिले जाते.

पतसंस्थेचे मा. चेअरमन .

पान ४ वर

## उल्लेखनीय कार्याबद्दल अतुल चोरमारे यांचा सन्मान



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** देवस्थानच्या जनसंपर्क कार्यालयात महाराष्ट्र विधिमंडळ अंदाज समितीचे सदस्य दर्शनासाठी येणार असल्याच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये देवस्थानचे कार्यकारी अधिकारी तथा भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी श्री. अतुल चोरमारे यांनी भूसंपादन विभागामध्ये उत्कृष्ट केलेल्या कार्याची दखल घेण्यात आली. त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्हाधिकारी माननीय श्री. पंकज आशिया यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

देवस्थानच्या सर्व विभागप्रमुखांच्या उपस्थितीत श्री. अतुल चोरमारे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.या प्रसंगी श्री. शनैश्वर देवस्थानचे कार्यकारी अधिकारी तथा भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी श्री. अतुल चोरमारे यांच्या उत्कृष्ट कार्याचे कौतुक करण्यात आले.

यावेळी देवस्थानचे वाघ , जनसंपर्क अधिकारी अनिल दरंदले यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

## नालेगावच्या लाल मातीत माऊली कोकाटेची विजयी कुस्ती!

**पंढरपूरच्या माऊली जमदाडेला चितपट करत पटकावली मानाची कुस्ती; नागपंचमीच्या आखाड्यात मल्लांच्या डावपेचांचा थरार । हिंदुत्व प्रतिष्ठान व नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने रंगले कुस्ती मैदान; विजयी मल्लांवर बक्षिसांचा वर्षाव**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील सीना नदीकाठी असलेल्या श्री वारुळाचा मारुती मंदिर परिसरात नागपंचमीनिमित्त भरलेल्या यात्रेच्या उत्साहात भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले. शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या सहकार्याने हिंदुत्व प्रतिष्ठान व नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने, युवा नेते तथा नगरसेवक पै. महेश लोंढे यांच्या पुढाकारातून झालेल्या या कुस्ती मैदानात राज्यभरातील नामवंत मल्लांनी सहभाग घेत लाल मातीच्या आखाड्यात आपल्या कुस्ती कौशल्याचे दर्शन घडविले. तोडीस तोड मल्ल आमनेसामने आल्याने एकापेक्षा एक रंगतदार कुस्त्या पाहण्याची पर्वणीच कुस्तीप्रेमींना मिळाली. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या कुस्ती मैदानाला प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती.

मुख्य कुस्तीत सोलापूरच्या माऊली कोकाटेने पंढरपूरच्या माऊली जमदाडेला चितपट करत विजय मिळविला. कोकाटेने केलेल्या दमदार डावाने नालेगावचा आखाडा टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला. कुस्तीप्रेमींनी विजयी मल्लाचे उत्स्फूर्त स्वागत करत त्याच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. सीना नदीकाठी असलेले श्री वारुळाचा मारुती मंदिर हे शहरातील अतिशय पुरातन व जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. दरवर्षी नागपंचमीच्या निमित्ताने या ठिकाणी मोठी यात्रा भरते. यात्रेच्या पार्श्वभूमीवर कुस्ती मैदान आयोजित करण्याची नालेगावची जुनी परंपरा आहे. शहरासह विशेषतः नालेगाव परिसराला कुस्तीची समृद्ध परंपरा लाभली असून, या परंपरेला पुढे नेत नवोदित मल्लांना प्रोत्साहन मिळावे, त्यांना मोठ्या आखाड्याचा अनुभव मिळावा आणि कुस्तीची संस्कृती जपली जावी, या उद्देशाने यंदाही भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले.

आखाड्यात लहान-मोठ्या मल्लांच्या अनेक कुस्त्या रंगल्या. प्रत्येक कुस्तीमध्ये मल्लांनी आपल्या ताकदीसोबतच डावपेच, चपळाई आणि तंत्रशुद्ध कुस्तीचे प्रदर्शन केले. त्यामुळे मैदानावर उपस्थित असलेल्या प्रेक्षकांमध्ये प्रत्येक कुस्तीबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती. मैदानातील सर्वाधिक आकर्षण ठरलेली एक नंबरची कुस्ती सोलापूरचा माऊली कोकाटे आणि पंढरपूरचा माऊली जमदाडे यांच्यात झाली. दोन्ही मल्लांनी सुरुवातीपासूनच सावध आणि आक्रमक खेळ करत एकमेकांचा अंदाज घेण्यास सुरुवात केली. काही वेळ डावपेचांचा खेळ रंगला. अखेर सोलापूरच्या माऊली कोकाटेने योग्य संधी साधत दमदार डाव टाकला आणि पंढरपूरच्या माऊली जमदाडेला चितपट केले.

कोकाटेच्या या विजयी डावानंतर आखाड्याभोवती उपस्थित असलेल्या हजारो कुस्तीप्रेमींनी टाळ्यांचा कडकडाट करत जल्लोष केला. विजयी मल्लाला मानाची चांदीची गदा आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते देण्यात आली. या कुस्ती मैदानाच्या आयोजनात युवा नेते तथा नगरसेवक पै. महेश लोंढे यांनी विशेष भूमिका बजावली. नालेगावची कुस्ती परंपरा आणि नवोदित मल्लांना व्यासपीठ मिळावे, यासाठी त्यांनी मैदानाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. मैदान यशस्वीपणे पार पडल्यानंतर पै. महेश लोंढे यांनी उपस्थितांचे, मल्लांचे, पंचांचे तसेच आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. यापुढील काळातही कुस्ती क्षेत्राला आवश्यक ते सहकार्य करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

शहरातील मल्लांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन आमदार संग्राम जगताप यांनी दिले. मैदानातील विजयी मल्लांवर आयोजक आणि कुस्तीप्रेमींकडून बक्षिसांचा वर्षाव पान ४ वर

## श्रीगोंदा-अहिल्यानगर तालुक्यातील ३२ गावांतील सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार - डॉ. सुजय विखे पाटील

**महायुती सरकारचे आभार; साकळाई योजनेच्या ९६७ कोटींच्या कामाचे टेंडर प्रसिद्ध**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर– नगर-अहिल्यानगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेतील साकळाई उपसा सिंचन योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला आता वेग आला आहे. दीर्घकाळ कागदोपत्री प्रक्रिया, आश्वासने आणि प्रशासकीय अडथळ्यांमध्ये रखडलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेचे ९६७ कोटी रुपयांचे टेंडर प्रसिद्ध झाले आहे. पुढील दोन ते तीन महिन्यांत टेंडर प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता असून, सर्व प्रक्रिया मार्गी लागल्यास दिवाळीच्या मुहूर्तावर योजनेच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल अशी माहिती डॉ सुजय विखे पाटील यांनी दिली.**

या योजनेमुळे अहिल्यानगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील ३२ जिरायती गावांमधील सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे दुष्काळी भागातील शेतीला शाश्वत पाण्याचा आधार मिळण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीतही बदल होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### अतिरिक्त पाण्यातून दुष्काळी भागाला दिलासा

१९५४ मध्ये घोड धरणासाठी केंद्रीय जल आयोगाने १०.४० टीएमसी पाणी साठ्याला मंजुरी दिली होती. मात्र प्रत्यक्षात धरणाची क्षमता ७.४० टीएमसी इतकी बांधण्यात आली. परिणामी दरवर्षी सुमारे तीन ते चार टीएमसी पाणी ओव्हरफ्लोच्या स्वरूपात वाहून जाते. या अतिरिक्त पाण्यापैकी १.८० टीएमसी पाणी साकळाई योजनेसाठी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव आहे.



### अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर निर्णायक टप्पा

साकळाई योजनेची मुहूर्तमेढ पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांनी रोवली होती. जिरायती भागातील शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा मिळावी, दुष्काळी गावांचा कायापालट व्हावा आणि शेतीला शाश्वत पाण्याचा आधार मिळावा, या उद्देशातून या योजनेची संकल्पना पुढे आली. मात्र अनेक वर्षे सरकारे आणि लोकप्रतिनिधी बदलत राहिले तरी योजनेचा प्रश्न मार्गी लागत नव्हता. प्रत्येक निवडणुकीत साकळाईचा मुद्दा चर्चेत येत होता; मात्र निवडणुकीनंतर प्रक्रिया पुन्हा संथ होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती.

### २०२२ नंतर या योजनेच्या प्रक्रियेला निर्णायक गती

माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी साकळाईचा विषय सातत्याने शासन दरबारी लावून धरत अधिकाऱ्यांच्या बैठका, प्रस्तावांचा पाठपुरावा, तांत्रिक अडचणी आणि सर्वे क्षणाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी प्रयत्न केले. २०२४ मध्ये योजनेचे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर योजनेला प्रत्यक्ष आकार मिळण्याची आशा निर्माण झाली. तसेच पाणी उपलब्धता प्रमाणपत्राचा अडथळा दूर सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर योजनेसमोरील महत्त्वाचा प्रश्न होता तो पाणी उपलब्धता प्रमाणपत्राचा. हा प्रश्न प्रलंबित राहिल्याने योजनेच्या पुढील प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांमध्ये पुन्हा संभ्रम निर्माण झाला होता. २०२४-२५ मध्ये जलसंपदा विभागाची जबाबदारी राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आल्यानंतर साकळाई योजनेच्या प्रक्रियेला पुन्हा वेग मिळाला. पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठका घेत योजनेतील अडथळे दूर करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर पाणी उपलब्धता प्रमाणपत्र, राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता आणि १,२३४ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाल्याने योजनेच्या पुढील प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला.

### आता ९६७ कोटींच्या कामाचे टेंडर

साकळाई उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी ९६७ कोटी रुपयांचे टेंडर प्रसिद्ध झाल्याने योजनेने आता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने पाऊल टाकले आहे. पुढील दोन ते तीन महिन्यांत टेंडर प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे. वनविभागासह अन्य संबंधित विभागांच्या आवश्यक मान्यतांसाठीही मागील महिन्यात टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. टेंडर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दिवाळीच्या मुहूर्तावर प्रत्यक्ष कामाचा श्रीगणेशा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून साकळाई योजनेच्या प्रत्यक्ष कामाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### साकळाईच्या वाटचालीतील महत्त्वाच्या घडामोडी

साकळाई योजनेचा इतिहास पाहता या मागणीसाठी अनेक वर्षे आंदोलने, निवेदने आणि बैठका झाल्या. प्रत्येक निवडणुकीत योजनेचा मुद्दा ऐरणीवर आला; मात्र प्रत्यक्ष काम सुरू झाले नव्हते.माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी खासदारकीच्या काळात सर्वे क्षण पूर्ण करून घेणे, प्रशासकीय पातळीवरील अडथळे दूर करणे आणि प्रस्तावाला गती देण्यासाठी पाठपुरावा केला. त्यानंतर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र, शासन मान्यता आणि निधी मंजुरीच्या प्रक्रियेला गती दिली.या प्रक्रियेत माजी मंत्री बबनराव पाचपुते, स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले, विद्यमान आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार अक्षय कर्डिले यांनी सहकार्याची भूमिका घेतली.

### ३२ जिरायती गावांना लाभ

साकळाई उपसा सिंचन योजनेचा लाभ अहिल्यानगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील ३२ जिरायती गावांना अपेक्षित आहे. यामध्ये चिखली, कोरेगाव, घोसपुरी, सारोळा कासार, खडकी, जाधववाडी, वाळकी, शिरढोण, हिवरे झरे, बाबुर्डी बेंड, दहिगाव, साकत, वाटेफळ, देऊळगाव सिद्धी, तांदळी, बडगाव, रुई छत्तीसी, आंबिलवाडी, गुणवडी, गुंडेगाव, राळेगण, मांडवगण, मठ पिंप्री, हातवळण, खांडगाव, महांडूळवाडी, कोळगाव, सुरेगाव, घुटेवाडी, कोतुळ, बांगर्डा आणि कामठी या गावांचा समावेश आहे.

### सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याची अपेक्षा

साकळाई योजना पूर्ण झाल्यास या भागातील शेतीच्या चित्रात मोठा बदल होणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या साकळाईच्या मागणीला आता प्रत्यक्ष कामाच्या रूपाने दिशा मिळते का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. साकळाई उपसा सिंचन योजनेला मिळालेल्या मंजुरी आणि पुढील प्रक्रियेला गती मिळाल्याबद्दल माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

## दै. आकर्षण निवडक

### नागपंचमीनिमित्त सर्पमित्राने पकडलेल्या नागाची विधीवत पूजा करून सर्प निसर्गात मुक्त



अहिल्यानगर - नागपंचमीच्या पार्श्वभूमीवर सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी सुरक्षितपणे पकडलेल्या नागाची नागपंचमीनिमित्त विधीवत पूजा करण्यात आली. नागदेवतेप्रती श्रद्धा व्यक्त करताना नागरिकांनी मोठ्या उत्साहात या पूजेत सहभाग घेतला. परिसरात आढळलेल्या नागाला सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी कोणतीही इजा न पोहोचवता कौशल्याने पकडले. नागपंचमीच्या दिवशी या नागाची पारंपरिक पद्धतीने पूजा करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी नागदेवतेचे दर्शन घेतले आणि सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली त्यानंतर सर्पाला निसर्गात मुक्त करण्यात आले. दरम्यान, साप दिसल्यास घाबरून त्याला मारू नये, तर सर्पमित्र किंवा संबंधित वन्यजीव बचाव पथकाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृष्णा पाटील बेरड यांनी केले. साप हा पर्यावरणातील महत्त्वाचा घटक असून, त्याचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. नागपंचमीच्या निमित्ताने श्रद्धेसोबतच सर्पसंवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाचा संदेश देणारा हा उपक्रम नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.

### आरोपीला तात्काळ अटक करू एमआयडीसी पोलिसांच्या पत्राने आमरण उपोषण आंदोलन स्थगित

अहिल्यानगर -लैंगिक अत्याचारातील पिडित महिलेला न्याय मिळावा. तसेच एमआयडीसी पोस्टे गुरनं. ४६९/२०२६ बी.एन.एस कलम ६४, ३५१(२) अन्वये दाखल गुन्हयातील आरोपी नामे प्रविण ऊर्फ बबलु दत्तात्रय गुंड, रा.शेंडी ता.जि.अहिल्यानगर यास तात्काळ सदर गुन्हयात अटक करावी.या मागणीसाठी दि.१५/०८/२०२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय अहिल्यानगर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गट महिला आघाडीच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष ज्योती फ्रान्सिस पवार यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण करण्यात आले. २५ जून २०२६ रोजी गुन्हा दाखल झाला असून आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेले नाही पीडित आरोपी मुक्तपणे फिरत असल्याने पीडित महिला व कुटुंबाला त्रास सहन करावा लागत आहे आरोपीला अटक करावी व पीडित महिलेला न्याय मिळावा.आरोपीला तात्काळ अटक न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा आंदोलनास पाठिंबा देत ओबीसी व्हिजेएनटी जन मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आला.यावेळी बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष माऊली मामा गायकवाड, सकल माळी समाजाचे अनिल इवळे,विनोद पुंड,कॅप्टन सुधीर पुंड आदींसह विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. आरोपीला अटक करण्यात येईल.याबाबत चे पत्र एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी रिपब्लिकन पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष ज्योती पवार व ओबीसी व्हिजेएनटी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांना पत्र देऊन तसेच उपोषण करताना लिंबू सरबत देऊन हे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

### स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वृक्षारोपण उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग

अहिल्यानगर - वाढते प्रदूषण आणि बदलते हवामानाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या झाडांचे संगोपन करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले. सावेडी येथील संजीवनी फौंडेशन संचलित मूकबधिर विद्यालयाच्या परिसरात स्नेहबंध सोशल फौंडेशन, अहिल्यानगरतर्फे वृक्षारोपण करण्यात आले. डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा शुभारंभ झाला. यावेळी जगधने बी. के. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे वृक्षारोपणात सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. केवळ झाडे लावणे नव्हे, तर त्यांचे नियमित संगोपन करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

# स्त्रीरोग व गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद; १५५ रुग्णांची तपासणी

**आनंदऋषीजी हॉस्पिटलचे आरोग्य शिबिरे रुग्णांसाठी पर्वणीच ठरली आहे–उद्योजक चंद्रकांत मुथा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आचार्य गुरुदेव आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशीर्वादाने सुरू झालेले आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ''मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा'' आहे.हे समजून आरोग्यसेवा दिली जात आहे.आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची सेवा घडत आहे.या मोफत आरोग्य शिबिरात मुथा परिवाराला आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील शिबिराचे माध्यमातून सेवा करण्याची भाग्य मिळाले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल ची कीर्ती सर्व दूर पसरली आहे. सध्या न परवडणारा औषधाचा खर्च यामूळे आनंदऋषीजी हॉस्पिटलचे आरोग्य शिबिरे रुग्णांसाठी पर्वणीच ठरली आहे.असे प्रतिपादन उद्योजक चंद्रकांत मुथा यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या १२६ व्या जन्मदिना निमित्त स्त्री रोग व गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन स्व.रतनचंद्रजी मुथा स्मरणार्थ शिबिराचे उद्घाटन उद्योजक चंद्रकांत मुथा वांबोरीकर,श्रीमती मीनाताई मुनोत यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.याप्रसंगी आशिष मुथा, सौ.ज्योत्सनाताई मुथा,श्रद्धाताई बरमेचा आदींसह जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, सतीश लोढा,माणकचंद कटारिया,डॉ. आशिष भंडारी, वसंत चोपडा शिबिराचे तज्ञ डॉ.रवींद्र मुथा,डॉ.कृतिका पाटील,डॉ.नीलोफर धानोरकर आदी उपस्थित होते.

मीनाताई मुनोत म्हणाले, आपण केलेल्या कमाईचा वाटा समाजासाठी व दिन दुबळ्या वंचित रुग्णांना दिलाच पाहिजे.अशी शिकवण व संस्कार मुथा परिवाराने दिले आहेत.हाच सामाजिक कार्याचा वसा पुढे घेऊन माझे बंधू चंद्रकांत मुथा सामाजिक कार्य करीत आहे. चार वर्षांपूर्वी त्यांनी दोन डायलेसिस मशीन आनंदऋषीजी हॉस्पिटल ला दिले आहेत.तसेच लहान भाऊ अजय मुथा यांनी एक डायलेसिस मशीन दिली आहे.आचार्य गुरुदेव यांच्या आशीर्वादाने आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आलेले सर्व रुग्ण बरे होत आहे.येथील सर्व डॉक्टर्स सेवाभावी वृत्तीने काम करीत आहे.तसेच जैन सोशल फेडरेशनचे सर्व कार्यकर्ते अत्यंत तळमळीने रुग्णसेवेचे कार्य करीत आहेत.येथे येणाऱ्या रुग्णांना अल्प दरात आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य कौतुकास्पद आहे.अहिल्यनगर जिल्ह्यासह सर्व भारतभर आनंदऋषीजी हॉस्पिटल चा नावलौकिक आहे.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले,मीनाताई मुनोत यांनी हॉस्पिटलच्या उभारणीच्या आधीपासूनच दैनिक नगरटाईम्स च्या माध्यमातून आनंदऋषीजी हॉस्पिटल ला सहकार्य केले आहे.ताईच्या सद्भावना व सदिच्छा आमच्या पाठीशी असल्याने जैन सोशल फेडरेशनच्या कार्यकर्त्यांना सामाजिक करताना मोठी ऊर्जा मिळत असते.तसेच उद्योजक चंद्रकांत मुथा व मुथा परिवार हा आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात पूर्वीपासूनच जोडला गेलेला आहे.मुथा परिवार हा सामाजिक कार्यात अग्रेसर आहे.मुथा परिवारासारखे अनेक परिवार आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्यात योगदान देत असल्याने वर्षभर विविध आरोग्य शिबिरे रुग्णांसाठी भरविले जात आहेत. झोपडपट्टी,विणकर कामगार व बांधकाम कामगार करणाऱ्या गर्भवती महिला येथे उपचारासाठी येत असतात.कुपोषित बाळ जन्माला येऊ नये.यासाठी आरोग्य शिबिरांच्या मार्फत मार्च व ऑगस्ट दरम्यान मोठ्या प्रमाणात शिबिरे घेतली जातात.या शिबिराचा लाभ पाच ते सहा हजार रुग्ण घेतात.''समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा मिळावी'' हे आचार्य आनंदऋषीजी महाराजांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जैन सोशल फेडरेशन चे सर्व सदस्य कार्यरत आहेत.

या शिबिरात १५५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले.तर आभार सतीश लोढा यांनी मानले.

# इयत्ता दहावी परीक्षेच्या ऑनलाइन आवेदनपत्रासाठी १९ ऑगस्टपासून प्रक्रिया

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) फेब्रुवारीमार्च २०२७ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची ऑनलाइन आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. नियमित विद्यार्थ्यांसह पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र ( ) प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुर्कळक विषय घेऊन परीक्षेला प्रविष्ट होणारे विद्यार्थी तसेच संस्थेद्वारे घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे संबंधित शाळांमार्फत + मधील – वापरून ऑनलाइन पद्धतीने भरता येणार आहेत. इतर पात्र विद्यार्थ्यांची आवेदनपत्रेही मंडळाच्या संकेतस्थळावरून शाळा प्रमुखांमार्फत ऑनलाइन पद्धतीने भरावी लागणार आहेत. नियमित शुल्कासाठी १९ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आवेदनपत्रे स्वीकारली जाणार आहेत. माध्यमिक शाळांनी निश्चित पद्धतीने शुल्क भरावयाच्या प्रक्रियेसाठी ३१ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ असा कालावधी देण्यात आला आहे.

नियमित मुदतीत आवेदनपत्र न भरलेल्या विद्यार्थ्यांना विलंब शुल्कासह १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अर्ज करता येणार आहे. त्यानंतर अतिविलंब शुल्कासह १६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत आवेदनपत्रे स्वीकारली जातील. या कालावधीत विद्यार्थ्याला प्रतिदिन ५० रुपये अतिविलंब शुल्क आकारण्यात येणार आहे.

माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरून घेतल्यानंतर आवश्यक शुल्काची रक्कम एकत्रित करून संबंधित विभागीय मंडळाकडे जमा करणे आवश्यक आहे. शुल्क पावती व विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करण्याची अंतिम तारीख सोमवार, ७ डिसेंबर २०२६ अशी देण्यात आली आहे.

दरम्यान, आवेदनपत्रातील विद्यार्थ्याचे नाव, जन्मतारीख आदी माहिती अचूक भरावी, तसेच प्रिलिस्ट अथवा आवेदनपत्राच्या प्रिंटवर विद्यार्थी किंवा पालकांची स्वाक्षरी घेण्यात यावी, अशा सूचना मंडळाने दिल्या आहेत. आवेदनपत्र भरल्यानंतर व प्रवेशपत्र तयार झाल्यानंतर विद्यार्थ्याचा फोटो बदलता येणार नसल्याने फोटो अपलोड करताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. फोटो स्वरूपात, साधारण २५ ते ४० आकाराचा आणि अलीकडील असावा. फोटो स्पष्ट, समोरून घेतलेला आणि साध्या किंवा पांढऱ्या पार्श्वभूमीचा असावा. आवेदनपत्र मंडळाकडे पाठविल्यानंतर व प्रवेशपत्र तयार झाल्यानंतर कोणताही फोटो बदलता येणार नाही. मंडळाने स्पष्ट केले आहे की आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ दिली जाणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व संबंधित माध्यमिक शाळांनी दिलेल्या मुदतीत ऑनलाइन आवेदनपत्राची प्रक्रिया पूर्ण करून शुल्क भरण्याची कार्यवाही करावी.

**श्री संताजी नागरी पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात**

# अहिल्यानगरात संस्थेची प्रतिमा उंचावेल असे काम सुरू – हरिभाऊ डोळसे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तेली समाज पंचवाडा येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभागृहात श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन हरिभाऊ डोळसे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी संचालक मंडळासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला संत श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अहवाल वर्षात दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

संस्थेची वाटचाल संताजी महाराजांच्या विचारांनी - हरिभाऊ डोळसे

सभेला मार्गदर्शन करताना चेअरमन हरिभाऊ डोळसे म्हणाले, ''श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या विचारांनी पतसंस्थेची वाटचाल सुरू आहे. संस्थेने सभासदांच्या हितासाठी वेळोवेळी योग्य निर्णय घेतले आहेत.

गेल्या काही वर्षात संस्था थांबल्यासारखी होती. परंतु आता आम्ही फक्त आणि फक्त जुनी थकित कर्जे वसूल करण्यावर भर दिला आहे. नवीन ठेवी किंवा बचत ठेवी सध्या घेतल्या जात नाहीत.

थकबाकीदारांकडून वसुलीसाठी जप्तीची कारवाई, जामीनदारांची जबाबदारी निश्चित करणे, त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढविणे आणि वेळोवेळी भेटी देऊन पाठपुरावा करण्यात आला. काही पात्र कर्जदारांना योग्य सवलत देऊन त्यांची कर्ज खाती बंद करण्यात आली. इतर ठेवीदारांच्या ठेवीही सुखरूप परत करण्यात आल्या आहेत.

संस्थेचे ऑडिट स्वच्छ आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण झाले आहे. संस्थेत भ्रष्टाचाराला जागा ठेवली नाही. आज संस्थेसमोर कोणतीही अडचण नाही. श्री संताजी नागरी पतसंस्थेची प्रतिमा अहिल्यानगर शहरात उंचावेल असे

# स्व. माधवराव मुळे प्रतिष्ठानच्या जिल्हास्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात

**५ हजार ५२१ स्पर्धकांच्या सहभागाने स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्व. माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षणमहर्षी स्व. माधवरावजी मुळे तथा 'आबा' यांच्या ९४व्या जयंतीनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय चित्रकला व निबंध स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच उत्साहात पार पडला. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून तब्बल ५ हजार ५२१ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. विशेषतः निबंध स्पर्धेच्या खुल्या गटात शालेय शिक्षक, प्राध्यापक तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

न्यू टिळक रोड येथील सरदार पटेल मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड व लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे होते. ज्येष्ठ संपादक सुधीर लंके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश (दादा) मुळे, उपाध्यक्ष प्राचार्य दत्ता पाटील नारळे, सचिव प्राचार्य डॉ.एम. एम. तांबे, खजिनदार बजरंग पाडळकर, डॉ. महेश मुळे, प्रा. लालचंद हराळ, मीनाताई पोटे, प्रा. गणेश भगत, निलेश काळदाते, सुनील म्हस्के, महेश मुळे यांच्यासह प्राचार्य, मुख्यध्यापक ,विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. एम. एम. तांबे यांनी प्रतिष्ठानची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, स्व. माधवराव मुळे यांच्या विचाराप्रमाणे प्रतिष्ठानचे कार्य फुले, शाहू, आंबेडकर



विचाराने सुरू आहे. हाच वैचारिक वारसा विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून पुढे घेऊन जाण्याचे काम प्रतिष्ठान करीत आहे. समाजवादी विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजावा आणि समाजातील समस्यांची जाणीव निर्माण व्हावी, हा या स्पर्धेमागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. स्पर्धेला एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला की, परीक्षकांना परीक्षणासाठी १५ ते २० दिवस लागले. जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून स्पर्धकांनी सहभाग घेतल्याचे स्पष्ट करून त्यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले.

चित्रकला स्पर्धेचे परीक्षण करणारे कलाशिक्षक शारदा साठे, निलेश गणगले, मनीषा कदम, सचिन सांगळे, नारायण शेळके व अली चंद्रकांत तसेच निबंध स्पर्धेचे परीक्षक सविता सानप, प्रीती प्रभुणे, जयश्री देशपांडे, दत्तात्रय नकुलवाड, सुप्रिया पागिरे–वाळके व प्रा. गणेश भगत यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्पर्धक वैशाली मंगलाराम यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, या स्पर्धेमुळे सुप्त कलागुणांना वाव मिळाला. कला सादर करण्याची संधी मिळाली. उत्तम नियोजन व पारदर्शकता या स्पर्धेतून अनुभवता आल्याचे सांगितले.

ज्येष्ठ संपादक सुधीर लंके म्हणाले की, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेत आबांचे योगदान मोठे आहे. फुले, शाहू, आंबेडकर विचार घेऊन त्यांनी कार्य केले. समाजात निर्माण झालेले सध्याचे प्रश्न शाहू, फुले, आंबेडकर समजून घेतले तर प्रश्न उद्भवणार नाहीत. हे विचार जपणे व पुढे घेऊन जाणे ही लोकांची भूमिका व्हावी. ही भूमिका घेऊन समाजात काम करणे धाडसाचे काम आहे. समाजात सध्या बोलणे आणि लिहिणे अवघड झाले असून त्यावर निर्बंध येत आहेत, असेही त्यांनी नमूद केले. कला जीवनाचा दृष्टिकोन बदलते. निबंधाच्या

# श्रावणी सोमवारनिमित्त जय आनंद फाउंडेशनचा महारुद्र अभिषेक, विनोद (पिंटू) यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठीही केली प्रार्थना



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रावणातील पहिल्या सोमवारनिमित्त जय आनंद फाउंडेशनच्या वतीने सालाबादप्रमाणे खाकीदास बाबा मठ येथे महारुद्र अभिषेकाचे आयोजन करण्यात आले. विधिवत पूजा, रुद्राध्यायाचे पठण आणि अभिषेकाने मठ परिसर भक्तिमय झाला. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

श्रावण सोमवार हा भगवान महादेवाच्या आराधनेसाठी विशेष मानला जातो. यानिमित्त आयोजित महारुद्र अभिषेकात भगवान शिवाची विधिवत पूजा करण्यात आली. समाजातील सर्वांचे आरोग्य, सुख-समृद्धी, कुटुंबातील आनंद आणि सर्वांगीण कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली. तसेच फाउंडेशनचे सदस्य विनोद (पिंटू) यांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, यासाठीही महादेवाकडे प्रार्थना करण्यात आली.

फाउंडेशनचे अध्यक्ष अमित काबरा यांनी महारुद्र अभिषेकासाठी खाकीदास बाबा मठ उपलब्ध करून दिल्याबद्दल मठाच्या सर्व ट्रस्टींचे आभार मानले. यावेळी फाउंडेशनचे संस्थापक व मर्चंट बँकेचे संचालक कमलेश भंडारी, मठाचे ट्रस्टी मनोज मुंदडा, सी.ए. किरण भंडारी, सचिन कटारिया उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेश लड्ढा, नीलेश भंडारी, पवन बिहाणी, सचिन शिंगवी यांच्यासह जय आनंद फाउंडेशनच्या महिला व पुरुष सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

'एकत्र सेवा, एकत्र प्रगती' या संकल्पनेतून धार्मिक उपक्रम

जय आनंद फाउंडेशनच्या वतीने सामाजिक बांधिलकीसोबतच धार्मिक व आध्यात्मिक उपक्रमांनाही प्राधान्य दिले जाते. श्रद्धा, एकोपा आणि सकारात्मकतेचा संदेश समाजात पोहोचविण्याच्या उद्देशाने या महारुद्र अभिषेकाचे आयोजन करण्यात आले.

# 'क्वांटम कॉम्पुटिंग संगणकीय तंत्रज्ञानाची पुढील पिढी' विषयावर तांत्रिक व्याख्यान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर- कल्याण रोडवरील अभियंता भवन येथे अहिल्या नगर द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स लोकल सेंटरच्या वतीने 'क्वांटम कॉम्पुटिंग संगणकाच्या पुढील पिढीला समजून घेणे या विषयावर डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथील कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाईन इंजिनिअरिंग विभागाच्या सहाय्यक प्रा.सौ.पूजा वैकर ( ) यांनी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

आपल्या व्याख्यानातून त्यांनी क्वांटम कम्प्युटिंगची मूलभूत संकल्पना, क्वांटम बिट



(क्विबिट), अध्यारोपण स्थिती, क्वांटम परस्परसंबंधी जोडणी, पारंपरिक संगणक आणि क्वांटम संगणक यांमधील फरक सांगून भविष्यातील संगणकीय तंत्रज्ञानातील क्वांटम कम्प्युटिंगचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली. क्वांटम कम्प्युटिंगमुळे संगणकीय क्षेत्रात होणारे संभाव्य बदल आणि त्याच्या विविध क्षेत्रांतील उपयोगांवरही त्यांनी प्रकाश टाकला.

कार्यक्रमास द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स लोकल सेंटरचे मानद सचिव डॉ.दीपक विधाते, अध्यक्ष भारतभूषण भागवत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच श्री. सौरभ वैकर, इंजि.आर.पी. वायकर, इंजि. हरीश ठिगळे, इंजि.अरविंद पारगावकर, इंजि. मनोहर आणेकर, इंजि. प्रदीप तांदळे, अभियंते, प्राध्यापक, विद्यार्थी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील उपस्थितांनी व्याख्यानाचा लाभ घेतला.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त आज मोफत २० ऑगस्टला मेकअप प्रशिक्षण

अहिल्यानगर- येथील स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाच्या वतीने भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवात बागडपट्टीत जिव्हेश्वर भवन येथे दिनांक २० ऑगस्ट ला दुपारी ४ वा सर्वांसाठी खुला विनामूल्य मेकअप प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे महिला व युवतीचा कल स्मार्ट दिसण्याकडे असतो त्यामध्ये आपले व्यक्तिमत्व मेकअप सुंदर व आकर्षक दिसण्यासाठी त्याचा प्रयत्न असतो आपण छान आवरलय पण काही तरी कमी वाटतयअसा विचार त्याच्या मनात येतो त्यासाठी प्रोफेशनल मेकअप स्वतःचा स्वःताच शिका तसेच स्किन व पर्सनालिटी प्रमाणे मेकअप,ड्रेपिंग,हेअर केअर याचे मार्गदर्शन व काही खास मॅजिक टिप्स देण्यात येणार आहे यामध्ये युवा मेकअप आर्टिस्ट नक्षत्रा कांबळे या प्रशिक्षण देणार आहे. या मोफत प्रशिक्षण वर्गाचा जास्तीत जास्त युवती व महिलांनी लाभ घ्यावा व उपस्थित राहावे असे आवाहन स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांसह युवकांचा रिपाइं (गवई) पक्षात प्रवेश

अहिल्यानगर - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षात आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांसह युवकांनी रिपाइं (गवई) पक्षात प्रवेश केला. पक्षाचे शहरजिल्हा अध्यक्ष सुशांत म्हस्के यांनी नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. यावेळी पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला चालना देण्यासाठी महत्त्वाच्या नियुयाही जाहीर करण्यात आल्या. राहुल ठोकळ यांची शहर सचिवपदी, तर प्रकाश थोरात यांची शहर संघटकपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी दानिश शेख, गुलाम शेख, विजय शिरसाठ, अजीम खान, लकी वाघमारे, शुभम ठोंबे, जमीर सय्यद, योहान चाबुकस्वार, जावेद सय्यद, अजीज शेख, हुसेन चौधरी, अमोल भालेराव, अजय पठारे, प्रदीप साळवे, विशांत थोरात, सचिन कणगरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रिपाइं (गवई) पक्षाच्या माध्यमातून सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी सातत्याने काम करण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. आंबेडकरी विचारधारा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी युवकांची मोठी भूमिका असून, संघटन मजबूत करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचे आवाहन उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केले.नवनिर्वाचित पदाधिकारी राहुल ठोकळ व प्रकाश थोरात यांनी पक्षाने दिलेली जबाबदारी पद नसून सामाजिक बांधिलकी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक विचारांचा आणि सामाजिक समतेचा संदेश तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी काम केले जाणार आहे. समाजातील अन्याय, अत्याचार आणि वंचित घटकांच्या प्रश्नांविरोधात लोकशाही मार्गाने संघर्ष उभारला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### 'मुद्दल-व्याज फेडले, तरी जमिनीवर हक्क सांगितला जातोय' सावकाराच्या वारसांविरोधात केंद्रीय मंत्री आठवले यांच्याकडे तक्रार

अहिल्यानगर- खाजगी सावकाराकडून घेतलेले कर्ज आणि त्यावरील मुद्दल-व्याजाची रक्कम अदा केल्यानंतरही संबंधित जमीन सावकाराच्या वारसांकडून हक्क सांगत बळकावण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप पाथर्डी तालुक्यातील मिरी येथील पीडित कुटुंबीयांनी केला आहे. जमीन ताब्यात देण्यासाठी दबाव, दमदाटी व दहशत निर्माण केली जात असून, फोन तसेच मध्यस्थांमार्फत धमक्या दिल्या जात असल्याची तक्रार त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री तथा सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री ना. रामदास आठवले यांच्याकडे केली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून जमीन मूळ मालकाच्या कायदेशीर वारसांच्या नावे करण्याची मागणी करण्यात आली आहे.अहिल्यानगर दौऱ्यावर आलेले ना. रामदास आठवले यांची भेट घेऊन दिलीप राधाजी औताडे, बार्णबस बाबू औताडे, आनंदी उत्तम भाहवे, मंदा वसंत पाटोळे, बबीतादास गायकवाड व बी. डी. गायकवाड यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या उपस्थितीत निवेदन दिले. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, मिरी येथील सर्वे नंबर ९५, गट नंबर ९६ मधील ७.९२ हेक्टर जमीन त्यांचे आजोबा शंकर खंडू औताडे यांच्या मालकीची होती. मुलाच्या लग्नासाठी आर्थिक गरज निर्माण झाल्याने सन १९६७ मध्ये त्यांनी खाजगी सावकाराकडून ४०० रुपये घेतले होते. त्यासाठी २० जुलै १९६७ रोजी गहाणखरेदीखत करण्यात आले होते.

## कासारे येथे विविध कामांचे भूमिपूजन, लोकार्पण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विशेष प्रयत्नातून कासारे परिसरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण संपन्न झाले. या विकासकामांमुळे कासारे परिसरातील रस्ते, सामाजिक सुविधा, पथदिवे आणि मूलभूत पायाभूत सुविधांना अधिक बळ मिळणार आहे.

या अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन, पंचशील नगरसाठी १० लाख रुपये, कासारे नरड वस्ती ते भोंद्रे शिव रस्ता सुधारणा करणे १८ लाख, कासारे गावठाण ते म्हातारखिळा रस्ता सुधारणा करणे १८ लाख, कासारे ते कारेगाव शिव रस्त्यासाठी १८ लाख, कासारे गावठाण ते लाखेवाडा रस्त्यासाठी ४ लाख, कासारे ते वाघदरा रस्ता खडीकरण- मुरमीकरण २० लाख, सिमेंट काँक्रिटीकरण वाघदरा १५५ मीटरसाठी १० लाख, चौकडवस्ती सिमेंट काँक्रिटीकरणासाठी ४ लाख, घनवट वस्ती ते गावदरा पाझर तलाव रस्ता खडीकरण-मुरमीकरणासाठी १० लाख तसेच पंचशील नगर स्ट्रीट लाईटसाठी २ लाख रुपयांच्या कामांचा समावेश आहे.

यावेळी आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, ''कासारे परिसरातील नागरिकांच्या गरजा आणि प्रलंबित प्रश्न लक्षात घेऊन विकासकामांना प्राधान्य दिले जात आहे. रस्ते, पाणी, वीज आणि सामाजिक सुविधांच्या माध्यमातून गावाच्या विकासाला स्थायी स्वरूप देण्याचा माझा प्रयत्न आहे. मतदारसंघातील प्रत्येक गाव विकासाच्या मुख्य प्रवाहात यावे, यासाठी उपलब्ध निधीचा योग्य विनियोग करून कामांना गती देणार आहे. विकासाची कामे केवळ कागदावर न राहता ती प्रत्यक्ष जनतेच्या जीवनात बदल घडवून आणणारी असावीत, हीच माझी भूमिका आहे,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत दादा गायकवाड, खरेदी-विक्री संघाचे माजी चेअरमन ॲड. बाबासाहेब खिलारी, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप रोहोकले, युवक राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष सुभाष सासवडे, राष्ट्रवादीच्या तालुका उपाध्यक्षा जयश्री शिंदे, ज्येष्ठ नागरिक तालुकाध्यक्ष अरुण राजदेव, साहेबराव दादा वाफारे, मिनीनाथ शिर्के, एल. के. झावरे गुरुजी, चेअरमन विलास झावरे, अरुण आग्रे, गोपीनाथ घुले, महाराष्ट्र राज्य वाहतूक संघटनेचे अध्यक्ष धनंजय निमसे, सरपंच शिवाजी दातीर, धोंडीभाऊ दातीर, वसंत दातीर यांच्यासह परिसरातील विविध गावचे मान्यवर पदाधिकारी, स्थानिक ग्रामस्थ, महीला वर्ग व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध विकासकामांना मिळालेली मंजुरी आणि त्याचे प्रत्यक्ष भूमिपूजन- लोकार्पण यामुळे कासारे परिसराच्या विकासाला नवी चालना मिळाली असून, ग्रामस्थांनी या कामांचे स्वागत केले.

> **''आमदार काशिनाथ दाते सरांच्या प्रयत्नातून कासारे परिसरातील विकासकामांना मिळालेली ही मोठी चालना आहे. रस्ते, सामाजिक सुविधा, पथदिवे आणि मूलभूत सोयींची कामे मार्गी लागल्याने ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनात निश्चितच सकारात्मक बदल घडेल. विकासकामांचा निधी आणण्यासोबतच त्यांचा प्रत्यक्ष पाठपुरावा करून कामे पूर्णत्वास नेण्याची आमदार दाते सरांची कार्यपद्धती कौतुकास्पद आहे. कासारेसह संपूर्ण मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्याचे त्यांची कार्यपद्धती निश्चितच पारनेरला विकासाच्या नव्या उंचीवर घेऊन जाईल.''**
>
> **- धनंजय निमसे**
> **(अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस वाहतूक सेना)**

## संस्कार, शिस्त, आज्ञापालन आणि वाचन व्यासंगाची कास धरा – बाळासाहेब देशमुख




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ''विद्यार्थ्यांनी संस्कार, शिस्त, आई-वडील व गुरुजनांचे आज्ञापालन आणि वाचनाचा व्यासंग या चार सूत्रांची कास धरावी. या चार गोष्टींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडते आणि यशस्वी जीवनाची वाटचाल सुरू होते,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ कथालेखक बाळासाहेब देशमुख यांनी केले.

वॉरियर्स प्रि-प्रायमरी स्कूलमध्ये ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वॉरियर्स फाउंडेशनच्या अध्यक्षा शर्मिला गोसावी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून गायक, अभिनेते व व्याख्याते अजयकुमार पवार, सामाजिक कार्यकर्ते सुरेश शेळके आणि ज्येष्ठ कथालेखक बाळासाहेब देशमुख उपस्थित होते.

अजयकुमार पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना पवार म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासाची सवय लावून घ्यावी. मोबाईलचा अनावश्यक वापर टाळून अभ्यास, खेळ आणि सर्जनशील उपक्रमांकडे लक्ष द्यावे.''

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, वक्तृत्व, फॅन्सी ड्रेस आदी विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उपस्थित मान्यवरांनी दाद दिली. विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका स्मृती घोडेस्वार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वॉरियर्स फाउंडेशनच्या उपाध्यक्ष आरती गिरी, हर्षली गिरी आणि वर्षा गुजर यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी पालक, विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी दिशा गोसावी यांनी सर्वांच्या आभार मानले.

## श्रावण महिन्याचे औचित्य साधत पीएनजी ज्वेलर्सकडून पारंपरिक मंगळसूत्र महोत्सवाची घोषणा

**पारंपरिक सोन्याच्या मंगळसूत्रांपासून आधुनिक डायमंड डिझाइन्सपर्यंत, परंपरा आणि दैनंदिन आकर्षकता यांचा सुंदर संगम असलेला विस्तृत संग्रह सादर**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतीय वैवाहिक परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक असलेल्या मंगळसूत्राचे सांस्कृतिक महत्त्व जपत, पीएनजी ज्वेलर्सने आपल्या बहुप्रतीक्षित मंगळसूत्र महोत्सवाची घोषणा केली आहे. हा महोत्सव १३ ऑगस्ट ते १३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत भारतातील सर्व पीएनजी ज्वेलर्स शोरूममध्ये सुरू असणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतीय महिलांच्या बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेऊन, परंपरेचा वारसा जपत विविध शैलींतील मंगळसूत्रांचा सर्वाधिक वैविध्यपूर्ण आणि आकर्षक संग्रह ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून मंगळसूत्र महोत्सव हा पीएनजी ज्वेलर्सचा एक वैशिष्ट्यपूर्ण वार्षिक उपक्रम म्हणून ओळखला जातो. या महोत्सवात पारंपरिक, आधुनिक तसेच हलक्या वजनाच्या मंगळसूत्रांचा विस्तृत संग्रह उपलब्ध असून, सणासुदीच्या प्रसंगांपासून ते दैनंदिन वापरापर्यंत प्रत्येक गरज पूर्ण करणाऱ्या विविध डिझाइन्स ग्राहकांना पाहायला मिळतील. यंदाच्या संग्रहात आकर्षक सोन्याची मंगळसूत्रे, सॉलिटेअर-प्रेरित डायमंड मंगळसूत्रे, दैनंदिन वापरासाठी उपयुक्त मिनिमलिस्ट डिझाइन्स तसेच व्यक्तिमत्त्वाला अधिक उठाव देणाऱ्या आधुनिक शैलीतील मंगळसूत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

सर्व वयोगटातील विवाहित महिलांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन साकारण्यात आलेला हा संग्रह, श्रावण महिन्याच्या निमित्ताने पत्नी, सून किंवा कुटुंबातील महिलांना अर्थपूर्ण भेट देऊ इच्छिणाऱ्या पती आणि कुटुंबीयांसाठीही एक उत्तम पर्याय ठरणार आहे. उत्कृष्ट कारागिरी आणि परवडणाऱ्या किमतीचा समतोल साधत, विविध शैली, आवडीनिवडी आणि बजेटनुसार मंगळसूत्रांची निवड करण्याची संधी या महोत्सवातून ग्राहकांना मिळणार आहे.

या महोत्सवादरम्यान ग्राहकांना मंगळसूत्रांच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेस केवळ ७.९९% पासून उपलब्ध असतील. ही विशेष ऑफर १३ सप्टेंबर २०२६ पर्यंत मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध असेल. त्यामुळे परंपरा, प्रेम आणि वैवाहिक बंधाचे प्रतीक असलेले मंगळसूत्र आकर्षक ऑफर्ससह खरेदी करण्याची ही सुवर्णसंधी आहे. याबाबत बोलताना पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, ''भारतीय

## तुकाराम मुंडे यांच्या अन्नभेसळविरोधी मोहिमेला शासनाचे संरक्षण द्या

**सर्वोच्च न्यायालयाचे मध्यस्थ ॲड. डॉ. अशोक यांच्या निवेदनाची मुख्यमंत्री कार्यालयाकडून तत्काळ दखल**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** महाराष्ट्रात अन्नभेसळ, अस्वच्छ अन्ननिर्मिती, निकृष्ट साठवणूक आणि विनापरवाना खाद्यव्यवसायांविरुद्ध कठोर कारवाई करणारे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त . तुकाराम मुंडे यांच्या मोहिमेला शासनाने पूर्ण पाठबळ व संस्थात्मक संरक्षण द्यावे. न्यू लॉ कॉलेजचे माजी प्राचार्य, सर्वोच्च सर्वोच्च न्यायालयाचे विधिज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ ॲड. डॉ.अशोक येंडे यांनी मुख्यमंत्री . देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे ही मागणी केली होती.

मुख्यमंत्री कार्यालयाने या निवेदनाची तात्काळ गांभीर्याने दखल घेत, पुढील योग्य कारवाईसाठी ते महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांकडे पाठवले असल्याचे डॉ. येडे यांना कळवले आहे. मुख्यमंत्री कार्यालयाचा हा त्वरित प्रतिसाद सार्वजनिक आरोग्य व प्रशासकीय उत्तरदायित्वाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. अशोक येडे यांच्या निवेदनात अन्नभेसळ ही केवळ ग्राहकांची फसवणूक नसून नागरिकांच्या आरोग्याला आणि जीवाला थेट धोका निर्माण करणारी बाब आहे.प्रशासकीय स्वायत्तता व कार्यकाळ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली कारवाई कायदेशीर प्रक्रिया, पारदर्शकता आणि समानतेच्या तत्त्वांचे पालन करून अधिक प्रभावीपणे राबवण्यात यावी. प्रभावशाली हितसंबंधांच्या दबावापासून अधिकाऱ्यांचे संरक्षण करून त्यांना पुरेसा कार्यकाळ व प्रशासकीय स्वायत्तता मिळायला हवी.

नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या प्रामाणिक व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांना आवश्यक असलेल्या संस्थात्मक पाठबळाचा प्रश्न उपस्थित केला.अन्नभेसळीविरुद्धची लढाई ही केवळ एका अधिकाऱ्याची मोहीम नसून प्रत्येक नागरिकाच्या आरोग्याच्या आणि घटनात्मक जीवनाधिकाराच्या संरक्षणाची लढाई आहे. प्रामाणिक अधिकारी जनहितासाठी प्रभावी व्यवस्थेविरुद्ध उभा राहतो, तेव्हा शासन आणि समाजाने त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे ॲड. डॉ. येडे यांनी केली होती.

नागपुरात भाजप नेते, कार्यकर्त्यांना रविंद्र चव्हाण यांच्या कडून

## प्रत्यक्ष बैठकीत थेट कानपिचक्या: आपण सोशल मीडियावर कमी पडतो, स्पष्ट आरोप!

**आपण केंद्रात आणि राज्यात केलेली कामे सांगा – रविंद्र चव्हाण**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नागपूर पदवीधर मतदारसंघातील विजयासाठी नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील एकूण अंदाजे बारा लक्ष सुशिक्षित पदवीधर मतदारांपैकी किमान पन्नास हजार नवे मतदार नोंदणी करून घ्यावे आणि सोशल मीडियावर तसेच नागरिकांच्या प्रत्यक्ष गाठीभेटीत सक्रिय होत केंद्र तसेच राज्य सरकारने केलेल्या कामांचे प्रमोशन करावे अशा सूचना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नेत्यांना दिल्या.

नागपुरात मंचावर राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, भाजप आमदार प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, परिणय फुके आणि शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी असताना या कानपिचक्या त्यांनी दिल्या आहेत. नागपूर पदवीधर मतदारसंघाची निवडणूक अवघ्या चार महिन्यांवर येऊन ठेपली असताना आतापासूनच भाजपने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. गेल्यावेळी प्रथमच भाजपला पराभवाचा सामना करावा लागला होता त्याची आठवण करून देत प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पूर्व विदर्भात दोन दिवसांत सहा बैठका घेतल्या.

नागपूर च्या एअरपोर्ट बँकवेट हॉल येथील आपल्या दौऱ्याच्या अंतिम बैठकीत नागपूर शहर, नागपूर ग्रामीण आणि वर्धा येथील प्रमुख भाजप पदाधिकारी, नगरसेवक आणि नेत्यांच्या उपस्थितीत भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वात आधी आपल्याला ही निवडणूक जिंकायची आहे का.. आपली तशी इच्छा आहे का..असा सवाल टाकत रवींद्र चव्हाण यांनी सर्व उपस्थितांची विकेट घेतली.डिजिटल प्लॅटफॉर्म वर आपल्यापैकी किती जणांची सक्रिय उपस्थिती असते असे पुढे सवाल करत त्यांनी सर्व उपस्थितांना अंतर्मुख केले..आणि आपण सोशल मीडियावर कमी पडतो, असे सरळ स्पष्ट विधान करून कानपिचक्या दिल्या.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की नागपूर शहर, ग्रामीण आणि वर्धा मिळून सुमारे अंदाजे सत्तर लाख लोकसंख्या आहे. यापैकी सुशिक्षित पदवीधर अंदाजे १२ लाख असावेत असा अंदाज आहे. आपली राज्यात दीड लाखांपेक्षा जास्त सक्रिय सदस्य असलेली पार्टी. इथल्या ८० टक्के लोकांनी डिजिटल प्लॅटफॉर्म वर सक्रिय असल्याचे सांगितले आहे.

पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, राज्याचे मुख्यमंत्री आणि राज्याचे मंत्री यांनी घेतलेले निर्णय पाहून त्यासाठी डिजाइन बनवून तुमचे नाव, तुमचे पद यांचा उल्लेख करून आपल्या पेजवर टाकत राहिलो आणि शेअर करत राहिलो तर महाराष्ट्रात एक चांगले वातावरण तयार करण्यात यशस्वी ठरू.

आपल्यापैकी सोशल मिडिया क्षेत्रात तज्ज्ञ कोण आहे. त्याचे ऐकाल का. हे जर केलं तर त्याचे परिणाम लवकर दिसेल. केंद्र आणि राज्य सरकार ची कामे जनते पर्यंत पोहोचविणे, यावर भर दिला पाहिजे.

काही शक्ती अजेंडा घेऊन उतरतील. मग आपण काय करावं? तुमच्यापैकी नगरसेवक किती आहेत इथे. फक्त नगरसेवकच नाही, बाकी बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख आदी मुख्य कार्यकर्त्यांनी लक्ष दिलें पाहिजे. आपण जेव्हा लोकांच्या भेटी घेतो. तेव्हा ते आपल्या समस्या सांगतात. त्या ऐकल्याच पाहिजे. पण त्याच वेळी आपण झालो पाहिजे. आपली भाजप कार्यकर्ते म्हणून वेगळी ओळख. आपण ठरवायचे की अशावेळी त्यांना काय सांगावे?

आपण राजकारणात कशासाठी आहोत. सत्तेसाठी नव्हे तर राष्ट्राचे हित साधण्यासाठी आहोत. गेल्या काही काळात आपण प्रत्येक निवडणुका जिंकत आहोत. आपला जाहीरनामा अजेंडा हा अटलजी पासून मोदीजी पर्यंत राष्ट्रहिताचाच तोच अजेंडा आहे. वेगळे काही नाही. राष्ट्राचे हित आणि विकास हाच अजेंडा.

पश्चिम बंगाल ची निवडणूक जिंकल्याने देशाचे काय भले झाले ते आपल्याला सर्वांना माहित असून आपण बोलत नाही. ते आपण सांगितले पाहिजे. पश्चिम बंगालमध्ये दुसऱ्याच दिवशी कॅबिनेट निर्णय झाला की घुसखोरी जिथून होते ती जागा केंद्राला देण्याचा निर्णय झाला. मोदींनी देशाच्या पुढील भविष्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक निर्णय घेतले आहेत. आपण जर तिरंगा रॅली करत आहोत तर कशासाठी ते सांगितले पाहिजे. रशियाच्या अंतराळवीरांनी भारताचा तिरंगा दाखवून भारताच्या स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. का दिल्या, भारत त्या स्थितीत पोहोचला आहे.२०४७ चा विकसित भारत बनविण्यासाठी आपल्या मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचा काय रोल ते सांगणे आवश्यक आहे.महाराष्ट्रात आधी दुष्काळ कसा होता. आपण काय करू शकलो. कागदावर असलेल्या योजना प्रत्यक्षात आणल्या. याला केंद्राचे असलेले योगदान काय. पुढच्या पिढीला दिशा देणाऱ्या या सर्व योजना आहेत.१४ तास लोडशेडींग होते. आज वन नेशन वन ग्रीड योजना राबवली गेली. विजेचा पुरवठा, विजेचे दर कमी करण्याच्या दिशेने प्रयत्न केले.उद्योग क्षेत्रात काय होत आहेत. वर बोललो पाहिजे. या सर्व गोष्टी लोकांपर्यंत चांगले सांगण्यास सुरुवात करा.ज्या राष्ट्रीयत्वाच्या धाग्याने आपण सारे जोडले गेले आहोत, ज्या राष्ट्रीयत्वसाठी आपण राजकारणात आलो, ते आपले मूळ सामान्य लोकांपर्यंत अधिक प्रमाणात सांगायला सुरुवात करा.

## कारगिल योद्धा शिवाजी पालवे यांच्या हस्ते ध्वजारोहण; बालकलाकारांच्या देशभक्तीपर कार्यक्रमाने 'एसा भवन' दुमदुमले!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अँड सर्व्हिअर्स असोसिएशनच्या (एसा) वतीने एसा भवन येथे ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कारगिल युद्धातील योद्धा तथा माजी सैनिक शिवाजी पालवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पोलाद स्टीलचे आशिष भाबडा, टिनी टोडलर प्री-स्कूलच्या मुख्याध्यापिका रूपाली परदेशी यांच्यासह एसा संस्थेचे पदाधिकारी, सभासद, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनानिमित्त टिनी टोडलर प्री-स्कूलच्या जवळपास १०० बालकलाकार विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या वेशभूषेत विविध देशभक्तीपर व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या या आकर्षक सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बालकलाकारांनी साकारलेल्या महापुरुषांच्या भूमिका आणि देशप्रेमाची भावना यामुळे



एसा भवन परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला.

यावेळी कारगिल योद्धा शिवाजी पालवे यांनी कारगिल युद्धातील थरारक आठवणींना उजाळा देत आपल्या अनुभवांचे कथन केले. ते म्हणाले की, देशप्रेम व्यक्त करण्यासाठी प्रत्यक्ष युद्धभूमीवर जाण्याची गरज नाही. मुलांनी चांगले शिक्षण घेऊन देशविधायक कामे केली, तरी ती देशसेवाच आहे. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या आणि आपल्या प्रेमाची आहुती देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांमुळे आज आपण स्वातंत्र्याचा आनंद घेत चांगले दिवस पाहत आहोत. देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी प्रत्येकाने आपण ज्या क्षेत्रात कार्यरत आहोत, त्या क्षेत्रात प्रामाणिकपणे व चांगले काम केले, तरी ती देशसेवा ठरू शकते.

यावेळी गोरख चिंचेचे रोप एसा भवनच्या आवारात पाहुण्यांच्या हस्ते लावण्यात आले. वृक्षाचे महत्त्व विशद करताना शिवाजी पालवे यांनी सध्याच्या जागतिक तापमानवाढीच्या आणि पर्यावरणीय बदलांच्या पार्श्वभूमीवर वृक्षारोपण हा सर्वोत्तम पर्याय असल्याचे सांगितले. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

पोलाद स्टील, जालनाचे आशिष भाबडा यांनी उपस्थितांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. पोलाद स्टीलच्या माध्यमातून शाळकरी मुलांसाठी प्लॅनेटोरियम उपक्रम राबविण्यात येत असून, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भूगोल आणि अंतराळाबद्दलची आवड निर्माण होण्यास मदत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेतून ८७ ज्येष्ठांना मिळाली 'नवदृष्टी'!

### स्वातंत्र्यदिनी तिरंगा हाती घेत 'भारत माता की जय', 'वंदे मातरम'च्या घोषणांनी फिनिक्सच्या उपक्रमाचा आनंदोत्सव । अवयवदानाची जनजागृती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दृष्टीदोषामुळे अंधुक झालेल्या आयुष्यात पुन्हा प्रकाश आणण्याच्या उद्देशाने फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरातून ८७ ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळाली. पुणे येथील हॉस्पिटलमध्ये या ज्येष्ठ नागरिकांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यात आल्या. स्वातंत्र्य दिनी हे ज्येष्ठ नागरिक अहिल्यानगरमध्ये परतल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर तिरंगा हाती घेऊन 'भारत माता की जय', 'वंदे मातरम 'च्या घोषणा देत स्वातंत्र्याचा उत्साह साजरा केला. शासनाच्या अवयवदान सप्ताहानिमित्त अवयवदानाची देखील जनजागृती करण्यात आली.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी शहरात परतलेल्या ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत केले. नवदृष्टी मिळालेल्या ज्येष्ठांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान यावेळी स्पष्टपणे दिसून येत होते. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने गरजू ज्येष्ठ नागरिकांना दृष्टीचा अनमोल प्रकाश मिळाल्याने हा दिवस त्यांच्यासाठी विशेष ठरला.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील दृष्टीहीन व मोतीबिंदूग्रस्त रुग्णांना पुन्हा दृष्टी मिळावी, या उद्देशाने फिनिक्स सोशल फाऊंडेशनने जिल्ह्यात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रियांची चळवळ उभी केली आहे. महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी तसेच राष्ट्रीय सण आणि विविध उत्सवांचे औचित्य साधून फाऊंडेशनच्या माध्यमातून नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जातात.

या शिबिरांमध्ये तपासणीनंतर मोतीबिंदूची शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या रुग्णांना पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रियेसाठी पाठविले जाते. त्यामुळे आर्थिक परिस्थितीमुळे उपचार घेणे शक्य नसलेल्या अनेक रुग्णांना मोठा आधार मिळत आहे. मोतीबिंदूमुळे दृष्टी कमी झाल्याने दैनंदिन जीवनातील अनेक कामांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागणाऱ्या ज्येष्ठांना शस्त्रक्रियेनंतर पुन्हा स्पष्ट दिसू लागल्याने त्यांच्या जीवनात आत्मविश्वास निर्माण होत आहे. यामुळे केवळ उपचारच नव्हे, तर त्यांच्या स्वावलंबनालाही बळ मिळत असल्याचे फाऊंडेशनच्या वतीने सांगण्यात आले.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू घटकांना आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या हेतूने फिनिक्स सोशल फाऊंडेशन सातत्याने विविध आरोग्यविषयक उपक्रम राबवत आहे. दर महिन्याला गरजू रुग्णांसाठी मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात येते. या माध्यमातून मोतीबिंदूग्रस्त रुग्णांची तपासणी करून त्यांना पुढील उपचारांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. फिनिक्सच्या या उपक्रमामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अनेक नागरिकांना महागड्या उपचारांचा आर्थिक भार न घेता मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करून घेता येत आहे. त्यामुळे गरजू रुग्णांसाठी ही आरोग्यसेवा आधारवड ठरत आहे.

फिनिक्स फाऊंडेशनच्या नेत्रविषयक

# सेंट मायकल स्कूलची दुहेरी विजयी आगेकूच

### उपांत्यपूर्व फेरीत १२ वर्षांखालील गटात १-०, तर १४ वर्षांखालील गटात टायब्रेकरवर ४-३ असा रोमांचक विजय

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी (दि. १८ ऑगस्ट) अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या उपांत्यपूर्व फेरीतील दोन्ही सामन्यांमध्ये फुटबॉलचा थरार अनुभवायला मिळाला. १२ वर्षांखालील मुलांच्या गटात सेंट मायकल स्कूलने आयकॉन पब्लिक स्कूलचा १-० असा पराभव करत विजयी आगेकूच केली. तर १४ वर्षांखालील मुलांच्या गटात सेंट मायकल स्कूलने आर्मी पब्लिक स्कूलला टायब्रेकरमध्ये ४-३ असे नमवत आणखी एक दिमाखदार विजय नोंदविला. विशेष म्हणजे, दोन्ही सामन्यांत सेंट मायकलच्या खेळाडूंनी निर्णायक क्षणी केलेल्या कामगिरीमुळे संघाला विजय मिळवून दिला.

१२ वर्षांखालील मुलांच्या गटातील आयकॉन पब्लिक स्कूल आणि सेंट मायकल स्कूल यांच्यातील सामना सुरुवातीपासूनच चुरशीचा झाला. दोन्ही संघांनी आक्रमक पवित्रा घेत प्रतिस्पर्ध्याच्या गोलक्षेत्रात वारंवार धडक देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मैदानावर प्रत्येक क्षणी उत्कंठा निर्माण झाली होती. सेंट मायकल स्कूलकडून १९ व्या मिनिटाला नावील याने अचूक गोल करत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. गोल झाल्यानंतर आयकॉन पब्लिक स्कूलने सामन्यात बरोबरी साधण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. आयकॉनच्या खेळाडूंनी सेंट मायकलच्या गोलक्षेत्रात आक्रमणे केली; मात्र सेंट मायकलच्या भक्कम बचावफळीने प्रत्येक प्रयत्न हाणून पाडला.

उत्तरार्धातही आयकॉन स्कूलने गोल करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. मात्र सेंट मायकलच्या बचावपटूंनी संयमी खेळ करत आघाडी कायम राखली. अखेर निर्धारित वेळेत आयकॉनला गोल करण्यात अपयश आले आणि सेंट मायकल स्कूलने १-० असा विजय मिळविला. नावील १९ व्या मिनिटाला केलेला गोल सामन्यात निर्णायक ठरला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि सेंट मायकल स्कूल यांच्यातील सामना अत्यंत अटीतटीचा झाला. दोन्ही संघांनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत सामन्यावर वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मैदानावरील सामना पाहण्यासाठी उपस्थित फुटबॉलप्रेमींमध्ये शेवटच्या क्षणापर्यंत उत्सुकता कायम होती. सेंट मायकल स्कूलकडून १२ व्या मिनिटाला ऋषी याने गोल करत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. मात्र आर्मी पब्लिक स्कूलने हार न मानता आक्रमण तीव्र केले. त्याचा परिणाम म्हणून १५ व्या मिनिटाला दिग्विजय याने गोल करत आर्मी पब्लिक स्कूलला १-१ अशी बरोबरी साधून दिली.

यानंतर दोन्ही संघांनी आघाडी मिळविण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. गोल करण्याच्या अनेक संधी निर्माण झाल्या; मात्र दोन्ही संघांच्या बचावफळीने त्या निष्फळ ठरवल्या. निर्धारित वेळ संपेपर्यंत दोन्ही संघ १-१ गोलने बरोबरीत राहिल्याने सामन्याचा निकाल टायब्रेकरवर निश्चित करण्यात आला.

# 'वंदे मातरम्'चे गायन मध्येच थांबवण्यास सांगून सोनिया गांधी यांनी त्याचा अपमान केला; जनता त्यांना कधीही माफ करणार नाही

### मतपेढीसाठी काँग्रेस वंदे मातरम् ला विसरली होती; मोदीजींनी त्याला नवे आयुष्य दिले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राजस्थानमधील चित्तोडगड जिल्ह्यातील निंबाहेडा येथे रविवारी माजी पंतप्रधान आणि भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या २१ फूट उंच भव्य पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मंचावर उभे राहिले, तेव्हा तेथे फक्त अटलजींच्या आठवणींची चर्चा झाली नाही, तर असा संदेशही दिला गेला, ज्याने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. भारतीय राजकारणाला नवी दिशा देणाऱ्या अमित शाह यांनी यावेळी काँग्रेसच्या त्या विचारसरणीवर टीका केली, ज्यामुळे अनेक दशकांपासून ''वंदे मातरम्''ला बाजूला ठेवण्यात आले, असा आरोप त्यांनी केला.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची कल्पना करा. इंग्रजांच्या राजवटीविरोधात संपूर्ण देश रस्त्यावर उतरला होता. हातात तिरंगा आणि ओठांवर एकच घोषणा होती''वंदे मातरम्!'' हे केवळ एक गीत नव्हते, तर गुलामगिरीविरोधात भारताच्या स्वाभिमानाचा आवाज होता. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या लेखणीतून जन्मलेले हे राष्ट्रगीत पुढे स्वातंत्र्य चळवळीच्या जनजागृतीचे प्रतीक बनले. १८९६ मध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात ''वंदे मातरम्''चे गायन केले. त्यानंतर क्रांतिकारकांपासून सामान्य नागरिकांपर्यंत सर्वांसाठी ते देशभक्तीचे प्रतीक बनले. हजारो-लाखो स्वातंत्र्यसैनिकांनी ''वंदे मातरम्''चा जयघोष करत फाशीचा दोर स्वीकारला, गोळ्या झेलल्या, लाठ्यांचा मार सहन केला आणि अनेक वर्षे तुरुंगाच्या अंधाऱ्या कोठड्यांमध्ये घालवली.

पण सत्तेच्या दीर्घ काळात काँग्रेसने व्होट बँकेच्या राजकारणासाठी या पवित्र मंत्राला जवळपास विसरून टाकले. स्वातंत्र्यानंतरच्या अनेक दशकांमध्ये ''वंदे मातरम्''ला त्याला मिळायला हवे होते, तेवढे महत्त्व आणि सन्मान मिळाला नाही. काँग्रेसच्या तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे त्याचे महत्त्व कमी करण्याचे आणि त्याला वारंवार कमकुवत करण्याचे प्रयत्न झाले. यानंतर तो क्षण आला, जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ''वंदे मातरम्''ला जन-गण-मनप्रमाणे राष्ट्रगीताचा दर्जा देण्यात आला. त्याला कायदेशीर संरक्षण मिळाले. लाल किल्ल्याच्या तटबंदीवरूनही ''वंदे मातरम्''चे स्वर घुमले. ८० वर्षांनंतर हे अमर गीत पुन्हा एकदा आपल्या गौरवाच्या स्थानावर पोहोचत होते. मात्र, याच काळात काँग्रेसच्या मुख्यालयात असे एक दृश्य पाहायला मिळाले, ज्यामुळे देशाला धक्का बसला. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात ''वंदे मातरम्''चे गायन सुरू असताना सोनिया गांधी यांनी काँग्रेस अध्यक्षांना मध्येच गायन थांबवण्याचा इशारा केला, असा दावा करण्यात आला. टीव्ही आणि कॅमेऱ्यांमधून संपूर्ण देशाने हा कथित अपमान पाहिला. सोनिया गांधी यांनी केलेल्या या कृत्याबद्दल देश त्यांना कधीही माफ करणार नाही, असे या भाषणात म्हटले आहे. त्यांना थोडीही लाज असेल, तर सोनिया गांधी यांनी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या अमर आत्म्याची आणि देशातील जनतेची माफी मागावी, असेही सांगण्यात आले.

आधुनिक भारताचे चाणक्य म्हणून ओळखले जाणारे अमित शाह यांनी या प्रसंगी काँग्रेसच्या त्या धोरणावर टीका केली, ज्यामुळे व्होट बँकेच्या राजकारणासाठी ''वंदे मातरम्''ला विसरले गेले, असा आरोप त्यांनी केला. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, काँग्रेसने व्होट बँकेच्या लालसेपोटी या गीताला बाजूला केले. मात्र, मोदीजींनी त्याला नवे आयुष्य आणि सन्मान दिला. आता ''वंदे मातरम्''ला पुन्हा सन्मान मिळत असताना काँग्रेसला ते आवडत नाही, असा आरोप करण्यात आला. अमित शाह यांच्या संपूर्ण भाषणात ''वंदे मातरम्''ची प्रतिष्ठा आणि काँग्रेसच्या भूमिकेवर जोरदार टीका करण्यात आली.

संपूर्ण देश पाहत आहे की, मोदी सरकारने ''वंदे मातरम्''ला राष्ट्रगीताप्रमाणे कायदेशीर संरक्षण दिल्यानंतरही काँग्रेसमध्ये अस्वस्थता दिसून आली. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी संपूर्ण देश हे गीत अभिमानाने गात असताना काँग्रेसच्या मुख्यालयात ते मध्येच थांबवण्याचा प्रयत्न करण्यात आला, असा दावा करण्यात आला. अमित शाह यांनी याला 'पाप' म्हटले आणि जनता हे कधीही माफ करणार नाही, असा स्पष्ट इशारा दिला.

या संपूर्ण प्रकरणात अमित शाह पुन्हा एकदा असे नेते म्हणून समोर आले, जे देशाच्या सांस्कृतिक वारशाचे रक्षण करण्यासाठी कोणतीही तडजोड न करता ठामपणे उभे राहतात. अखंड भारताचे प्रबळ समर्थक आणि ''वंदे मातरम्''ला जन-गण-मनप्रमाणे राष्ट्राचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे आधुनिक भारताचे चाणक्य अमित शाह यांनी निंबाहेडा येथून दिलेला संदेश केवळ एक भाषण नव्हता. तो एक इशारा, एक आठवण आणि एक संकल्प होता. आज देश ''वंदे मातरम्''च्या १५०व्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम साजरे करत असताना, काँग्रेसचे व्होट बँकेचे राजकारण आता चालणार नाही, असे स्पष्ट झाले आहे. राष्ट्रगीताचा अपमान करण्यासही मागेपुढे न पाहणाऱ्या लोकांना जनता आता ओळखू लागली आहे. अमित शाह यांच्या शब्दांनी पुन्हा एकदा हे दाखवून दिले की, राष्ट्रवादाच्या मार्गावर चालणारे नेते कोणत्याही दबावापुढे तडजोड करत नाहीत. या संपूर्ण घटनाक्रमाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना जाते. मोदीजींनी ''वंदे मातरम्''ला नवे जीवन दिले, तर अमित शाह यांनी त्याच्या सन्मानाच्या रक्षणासाठी काँग्रेसची भूमिका देशासमोर मांडली. इतिहास साक्षी आहे की, जो राष्ट्रगीताचा अपमान करतो, त्याला जनता कधीही माफ करत नाही. अमित शाह यांनी पुन्हा एकदा हीच गोष्ट स्पष्ट केली आहे. यावरून असे दिसून येते की, शाह यांच्यासाठी ''वंदे मातरम्'' हे केवळ भूतकाळातील एखादे गीत नाही. ते भारताची सांस्कृतिक आणि सभ्यतागत ओळख, अखंड भारताची भावना आणि राष्ट्रीय स्वाभिमानाचे प्रतीक आहे. म्हणूनच अमित शाह यांच्याकडे 'अखंड भारताचे प्रबळ समर्थक', 'राष्ट्रीय स्वाभिमानाचे रक्षक' आणि 'वंदे मातरम्'ला जन-गण-मनप्रमाणे कायदेशीर सन्मान मिळवून देणारे आधुनिक भारताचे चाणक्य' म्हणून पाहिले जाऊ शकते.

# स्वातंत्र्यसैनिक मुक्ताबाई निवारे यांचे बेमुदत उपोषण; शेतरस्त्याला विरोध




(छाया- सतिष जगताप )

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** आपल्या शेतातून रस्ता काढण्याचा तहसीलदारांचा आदेश रद्द करावा, या मागणीसाठी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक मुक्ताबाई निवारे यांनी तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या शेतातून रस्ता काढण्यास निवारे कुटुंबीयांचा तीव्र विरोध आहे.

पैठण तालुक्यातील आनंदपुर गावातील शेतरस्त्याच्या प्रकरणावरून हा वाद निर्माण झाला आहे. मुक्ताबाई निवारे यांचा मुलगा अनिल निवारे यांनी गट क्रमांक ११८ मधून शेतरस्ता करण्यासाठी अर्ज केला होता. पाहणी व चौकशी प्रक्रियेनंतर गट क्रमांक ११८ मधून रस्ता काढण्याचा आदेश तहसीलदार ज्योती पवार यांनी जारी केला.

या आदेशाची अंमलबजावणी १९ ऑगस्टपासून होणार असल्याने मुक्ताबाई निवारे यांनी तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. त्यांनी तहसीलदारांना निवेदन देत आदेशाला विरोध केला आहे. शेतातील रस्ता काढण्यापूर्वी योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, तहसीलदार ज्योती पवार यांनी सांगितले की, नियम व प्राप्त अहवालानुसार गट क्रमांक ११८ मधून शेतरस्ता देण्यात येणार आहे. उपोषणकर्त्यांना रीतसर पत्र देण्यात आले असून, या प्रकरणात अपील करण्यात आले असल्याची माहितीही प्रशासनाकडून देण्यात आली. मात्र, कोणत्याही प्रकारचा स्थगिती आदेश प्राप्त झालेला नसल्याने नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# खासदार निलेश लंके कडून दराडे परिवाराची सात्वनपर भेट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** अहिल्यानगर जिल्ह्याचे खासदार निलेश लंके साहेब यांनी दराडे परिवाराची भेट घेत दशक्रिया विधीनिमीत्त उपस्थित राहत सात्वन केले खरवंडी कासार विविध कार्यकारी सोसायटीचे विद्यमान चेअरमन तथा मालेवाडी येथील रहिवासी भगवान यशवंत दराडे (गुरुजी) यांचे एका भीषण अपघातात दुःखद निधन झाले. या धक्कादायक घटनेमुळे मालेवाडी परिसरासह संपूर्ण खरवंडी कासार भागावर मोठी शोककळा पसरली आहे.

दराडे यांच्या निधनाचे वृत्त समजताच खासदार निलेश लंके यांनी शरद भगवान दराडे श्रीनिवास भगवान दराडे यांचे सात्वन केले पोलीस पोलिस अधिकारी राजेंद्र ढाकणे डॉ. ज्ञानेश्वर दराडे यांच्याशी हितगुज साधत सदर दुर्दैवी घटनेचा आढावा घेतला दशक्रिया विधी निमित्त परिसरातील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. याशिवाय राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली वाहिली.एक अष्टपैलू व मनमिळावू व्यक्तिमत्त्व अशी ओळख भगवान दराडे गुरुजी हे केवळ सहकार क्षेत्रातच नव्हे, तर राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातही एक चांगल्या आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचे म्हणून सर्वपरिचित होते. त्यांचा स्वभाव अत्यंत मनमिळावू होता. सर्वसामान्यांशी असलेली त्यांची आपुलकी आणि प्रत्येकाच्या सुख-दुःखात धावून जाण्याच्या वृत्तीमुळे त्यांचा समाजात खूप मोठा जनसंपर्क निर्माण झाला होता.खरवंडी कासार विकास सोसायटीचे विद्यमान चेअरमन म्हणून काम करत असताना त्यांनी परिसरातील शेतकरी आणि सभासदांच्या विविध प्रश्नांसाठी नेहमीच हिरीरीने काम केले.दशक्रिया विधी निमित्त हभप विवेकानंद महाराज शास्त्री(सिद्धेश्वर संस्थाण शिरूर कासार )हभप रामदास महाराजशास्त्री (श्रीक्षेत्र भगवानगड प्रतिनिधी )यांची प्रवचन सेवा संपन्न झाली.

# अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्युनिअर कॉलेजमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्ट संचलित अहमदनगर उर्दू प्रायमरी स्कूल, अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्युनिअर कॉलेज तसेच एम्स इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. मिसगर लायब्ररी परिसरात आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सईद सोलापुरे आणि सोहेल हनीफ उपस्थित होते. तसेच नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्टचे विश्वस्त वाजिद जावेद खान व इफ्तिखार अकील अहमद खान यांची विशेष उपस्थिती लाभली.

ध्वजारोहणानंतर प्रमुख पाहुणे प्रा. सईद सोलापुरे यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व विशद करताना देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शहीदांच्या त्याग व बलिदानाचे स्मरण केले. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन देशाबद्दल प्रेम, जबाबदारी आणि कर्तव्याची भावना मनात जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी उर्दू, मराठी, हिंदी आणि इंग्रजी या विविध भाषांमध्ये देशभक्तीपर भाषणे, कविता व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसरात देशभक्तीने भारावले होते. याप्रसंगी अहमदनगर उर्दू प्रायमरी स्कूलच्या मुख्याध्यापिका खान रुमाना, अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य खान मुनव्वर हुसेन सर तसेच एम्स इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका खान साबा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तिन्ही शैक्षणिक संस्थांतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

(पान १ वरून)

## चेअरमनपदी श्री. दिपक बोथरा आणि व्हा. चेअरमनपदी श्री. गणेश कॉंकरिया यांची निवड

किरण भंडारी, मा. व्हा. चेअरमन सौ. मधुबाला चोरडिया, संचालक श्री. ईश्वर धोका, सुमीत लोढा, परितोष मुथा, सौ. दिपाली सुराणा, सौ. गायत्री चोरडिया. तसेच तज्ञ संचालक सचिन कटारिया, मनोज राका, कायदे सल्लागार ॲड. डी. डी. खाबिया, निमंत्रीत सदस्य- श्री संतोष सुनदेचा, रितेश पारख, पियुष भंडारी, सौ. दिपिका गुगळे, तसेच व्यवस्थापक श्री विलास गाडिया व शाखाधिकारी व कर्मचारी वृंद आहेत.

## नालेगावच्या लाल मातीत माऊली कोकाटेची विजयी कुस्ती!

करण्यात आला. विजयी मल्लांना रोख स्वरूपात बक्षिसे देण्यात आली. उपविजयी मल्लांचाही रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. अनेक प्रेक्षकांनी विजयी मल्लांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांना रोख रकमेची बक्षिसे दिली. या मैदानासाठी राज्यभरातूनच नव्हे तर देशभरातून अनेक नामांकित मल्ल आणि वस्ताद मंडळी उपस्थित होती. कुस्ती पाहण्यासाठी परिसरातील मैदान प्रेक्षकांनी खचाखच भरले होते. यात्रेसाठी आलेल्या महिला वर्गानेही आखाड्यातील कुस्त्यांचा आनंद घेतला. मल्लांच्या प्रत्येक डावाला आणि विजयी चितपटला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त दाद मिळत होती. यावेळी ज्येष्ठ पैलवान तथा वस्ताद मारुती खंडागळे यांचा ग्रामस्थांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. मैदानात पंच म्हणून पै. संभाजी लोंढे, उपमहाराष्ट्र केसरी पै. अनिल गुंजाळ, पै. अर्जुन (देवा) शेळके, पै. बंडू शेळके, पै. सारंग वाघ, पै. युवराज करंजुले, पै. अजय म्हस्के आणि पै. दादा पांडूळे यांनी काम पाहिले.

मैदानाचे प्रभावी सूत्रसंचालन पै. हांगेश्वर धायगुडे यांनी केले. कुस्ती मैदान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आयोजक अशोक घोडके, पै. सुनिल कदम, पै. मिलिंद जपे, बाळासाहेब भापकर, दत्ता ठाणगे, विजय शिंदे, पै. मयुर जपे, पै. आकाश घोडके, पै. ओम खंडागळे, पै. शुभम लोंढे, बबन रोहोकले, शिवाजी कदम, गणेश शेठ साळुंके तसेच हिंदुत्व प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.